

### रयत शिक्षण संस्थेचे

# आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

# सांस्कृतिक विभाग

महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 133 व्या जयंती सोहळ्यानिमित्त यावर्षी विविध स्पर्धांचे ऑनलाईन पद्धतीनेआयोजन करण्यात आले. त्यात त्या त्या स्पर्धेच्या चेअरमन कडून स्पर्धेचा अहवाल घेण्यात आला. स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक यांच्या विद्यार्थ्यांची नावे जाहीर करण्यात आली.

## स्पर्धा क्र.१ –रांगोळी स्पर्धा

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. त्यांच्याकडून रांगोळी काढत असताना चा व्हिडिओ संकलित करण्यात आले. त्याचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. यासाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. गौरी पाटील, प्रा. नीता पाटील व प्रा.प्रियांका जिरगे यांनी काम पाहिले. तर या कमिटीचे चेअरमन म्हणून डॉ. नमिता पाटील यांनी कामकाज पार पाडले. गुणानुक्रमे

१. प्रथम क्रमांक –कु. श्वेता वासुदेव वासुदेव सावंत (बी.एस्सी २ ),

२. द्वितीय क्रमांक –कु. कोमल सुधीर पाटील (बी.एस्सी ३ )

३. तृतीय क्रमांक-कु. नम्रता सुनिल चौगुले (बीएस्सी 2)

## स्पर्धा क्र.२ - मेहंदी स्पर्धा

मेहंदी स्पर्धा ही विद्यार्थिनींना जीवनात उपयोगी पडणारी कला म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कमिटीचे चेअरमन म्हणून प्रा. नंदा बोराडे यांनी परिश्रम घेतले. मेहंदी काढत असताना विद्यार्थिनींकडून व्हिडिओ संकलित करून परीक्षकांची नेमणूक करण्यात आली. परीक्षक म्हणून प्रा. स्नेहल क्षीरसागर, प्रा.डॉ. वनिता राऊत व प्रा. नंदा बोराडे यांनी कामकाज पाहिले. त्यात पुढील प्रमाणे निकाल जाहीर करण्यात आला

१. प्रथम क्रमांक- कु. प्रतीक्षा विलास पाटील( बी.कॉम ३ )

२.द्वितीय क्रमांक- कु. नम्रता सुनिल चौगुले (बी.एस्सी 2

३. तृतीय क्रमांक – कु. वैष्णवी विलास मोहिते (बी.सीए 3)

## स्पर्धा क्र.३-पुष्परचना स्पर्धा

या स्पर्धेच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना कलात्मक पद्धतीने फुलांची मांडणी करता येते का? त्यांच्याकडील संवेदनक्षमता तपासण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे चेअरमन प्रा. स्नेहा वाघ या होत्या.तर परीक्षक म्हणून प्रा. प्रियांका जिरगे ,प्रा.अभिजीत माने ,प्रा.दिनेश ससाणे यांनी कामकाज पाहिले. स्पर्धेतील यशस्वी स्पर्धक निवडण्यात आले .

१.प्रथम क्रमांक- कु. नम्रता सुनिल चौगुले( बी.एस्सी 2)

२. द्वितीय क्रमांक-कु. मैथिली सतीश जाधव (बी.एस्सी १ )

३.तृतीय क्रमांक (विभागून )- कु.संजीवनी भास्कर देशमुख (बी.एस्सी.१ ),

कु. कोमल सुधीर पाटील (बी.एस्सी .३ )

## स्पर्धा क्र.४ - निबंध स्पर्धा

विद्यार्थ्यांच्या विचाराला वाव मिळावा आणि ते प्रत्यक्ष शब्दबद्ध व्हावे व व कलात्मक लेखन साहित्याची आवड व मांडणीचे कौशल्य तपासण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली .स्पर्धेचे चेअरमन म्हणून प्रा. तेजस चव्हाण यांनी परिश्रम घेतले. तर परीक्षक म्हणून प्रा. दिलीप कोने म, प्रा.महेश दिघे ,प्रा. युवराज साबळे यांनी परीक्षण केले.त्यातून हंस निरीक्षरी पद्धतीने यशस्वी स्पर्धकांची निवड करण्यात आली.

१.प्रथम क्रमांक –कु. कोमल सुधीर पाटील( बी.एस्सी.३ )

२. द्वितीय क्रमांक-कु. नम्रता सुनिल चौगुले (बी.एस्सी 2)

३. तृतीय क्रमांक –कु. ऋतुजा धनंजय पाटील (बी.कॉम 2)

## स्पर्धा क्र.५ -वक्तृत्व स्पर्धा

काही विद्यार्थ्यांना उत्कृष्ट लेखन करता येते पण चारचौघात विचाराची मांडणी करताना व परखड विचार मांडताना गडबडून जातात. विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा यावा म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कमिटीचे चेअरमन प्रा.डॉ.उज्वला पाटील या होत्या. व परीक्षक म्हणून प्रा.डॉ.तानाजी भोसले, प्रा. नितीन कुंभार व प्रा.कु. नम्रता कांबळे यांनी परीक्षण केले. त्यातून गुणानुक्रमे क्रमांक काढण्यात आले .

१. प्रथम क्रमांक –कु.योगिता सुभाष जाधव (बी.एस्सी.२ )

२.द्वितीय क्रमांक-कु. अनिकेत हनुमंत जाधव (बी.एस्सी .३ )

३. तृतीय क्रमांक –कु.कोमल सुधीर पाटील (बी.एस्सी.३ )

## स्पर्धा क्र.६ -काव्यवाचन स्पर्धा

गेयात्मक रचना करणे ही वाटते तेवढी सोपी कला नाही तर यांना प्रतिभेचा कस लागतो म्हणून कवी हा जन्मावा लागतो घडवता येत नाही पण जन्मजात लाभलेली प्रतिभा कार्यान्वित करण्यासाठी काव्य लेखनाच्या माध्यमातून तपासता येते. म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यासाठी चेअरमन म्हणून प्रा. डॉ. के. बी. भोसले हे होते. तर परीक्षक म्हणून प्रा.डॉ. अशोक खाडे ,प्रा.धनेश गवारी व प्रा.कु. स्नेहा वाघ यांनी परीक्षण केले व गुणानुक्रमे तीन स्पर्धकांची निवड करण्यात आली.


१. प्रथम क्रमांक- कु. प्रतीक्षा विलास पाटील( बी.कॉम. ३)
२. द्वितीय क्रमांक- कु. प्राजक्ता दिनकर जाधव (बी.कॉम 2)
३. तृतीय क्रमांक-कु. स्वप्नाली तानाजी माने (बी.कॉम 2)

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 133 व्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात जयंती सोहळा पार पाडण्यात आला. त्यागमय जीवनाची अखंड गाथा म्हणजे कर्मवीरांचे व रयत माऊली वहिनींचे जीवन होय.स्वाभिमानाने या जळत्या ज्वालामुखीने बहुजनांच्या उत्थानासाठी अहोरात्र कष्ट केले. साऱ्या महाराष्ट्राला ज्ञानप्रकाशाचे लेणे देऊन दीपवले. त्यांचे कर्तृत्व अत्यंत देदीप्यमान असल्यामुळे त्यांच्या ऐतिहासिक कार्यामुळेच समाजाला कर्मवीर अण्णा व सौ. वहिनी स्फुर्तीस्थान वाटतात. सर्वसामान्य समाजात सरस्वतीच्या वीणेचा झंकार त्यांनीच पोहोचविला. आम्हीही शिकू शकतो असे अस्मिता निर्माण करणाऱ्या या दांपत्याला अभिवादन ! युगपुरुष काळाच्या खांद्यावर बसून आपल्या उज्वल कार्याची पताका जगभर पसरवितात आणि जनमनावर नव जागृतीच्या सूर्य किरणांचा वर्षाव करीतच राहतात. म्हणून महाविद्यालयात त्यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. याकामी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. बी पाटील (विज्ञान विभाग),प्रा. डॉ. के. बी. भोसले (कला व वाणिज्य विभाग) यांचे सहकार्य लाभले. तर स्पर्धा कमिटीचे सर्व चेअरमन व त्यांचे सदस्य यांच्या सहकार्यामुळेच स्पर्धा यशस्वी झाल्या. तसेच सांस्कृतिक कमिटीचे सर्व सदस्य यांचेही सहकार्य लाभले. त्यामुळे त्यांचेही आभार मानते. याकामी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

प्रा. प्रतिभा गुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

## वक्तृत्व स्पर्धेतील क्षणचित्रे :












## मेहंदी स्पर्धेचे छायाचित्रे:






## रांगोळी स्पर्धेचे फोटो :







## काव्यवाचन स्पर्धा :









## पुष्परचना स्पर्धा :







प्रा. प्रतिभा पुदाले
नेतृत्व,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)